Vol 3 Issue 2 March 2013

Impact Factor : 0.2105

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 2,March. 2013
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# आजचे प्राथमिक शिक्षण : दिशा परिणाम व उपाय

*जवाहर लक्ष्मण मोरे*

एम्.ए.बी.एड्.नेट,एम्.फिल्.
संतोष भीमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर

***सारांशः***

आज केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्याकडून शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले आहे. शासन, भारतीय विचारवंत, तत्वज्ञ आणि शिक्षणशास्त्रज्ञानी काही प्रयोग केले, निष्कर्ष काढले आणि सिध्दांत प्रस्थापित केले शिक्षणातून समता, बंधूता, मानवता, व्यक्तिस्वातंत्र्य हया मूल्यांचा परिचय होऊ लागला. सामाजिक सुधारणा प्रबोधन, उन्नती मानवी जीवन सुधारण्यासाठी खऱ्या अर्थाने शिक्षणाचा उपयोग करण्यात आला.

**प्रस्तावना -**

26 जानेवारी 1950 पासून अमलात आलेल्या भारतीय राज्यघटनेत प्राथमिक शिक्षणाविषयी 45 व्या कलमामध्ये संविधान स्विकारल्यापासून 10 वर्षाच्या आत सर्व बालकांना त्यांच्या वयास 14 वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत, सक्तीचे शिक्षण देण्यास सरकार प्रयत्नशील राहील. असा उल्लेख आढळतो. म्हणजेच प्रत्येक मुलास 14 वर्शे पूर्ण होईपर्यंत शिक्षणाची सोय करण्याची जबाबदारी शासनावर पडली. त्यानुसार शासनाच्या कार्यास सुरूवात झाली नंतर दुरूस्ती आणि मंजूर झालेल्या विधेयकानुसार प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण हा मुलभूत अधिकार प्राप्त झाला. त्यानंतर डॉ.राधाकृष्ण आयोग, डॉ.कोठारी आयोग, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व विविध कृतीकार्यक्रम तसेच एन.सी.ई.आर.टी. यांच्यातील शिफारशींचा प्राथमिक शिक्षणावर फार मोठा परिणाम झाला. त्यामध्ये–

वयाच्या 14 वर्षांपर्यंतचे मोफत व सक्तीचे शिक्षण
त्रिभाषा सूत्र प्रादेशिक व भाषांचा विकास
शिक्षणाची सर्वांना समान संधी
विज्ञान व संशोधनास चालना
शेती व उद्योगविषयक शिक्षणाचा विकास
शिक्षणाचा दर्जा उंचावणे, त्यांच्या प्रशिक्षणाची सोय करणे.
पाठयपुस्तकांचा दर्जा उंचावणे, विद्यार्थ्यांना मोफत व ती कमी किंमतीत उपलब्ध करून देणे.
साक्षरता प्रसार, प्रौढ शिक्षण व क्रीडा विकासास चालना देणे.
व्यावसायिक शिक्षणावर भर देणे.

इत्यादी बाबी आयोगाने आणि शिक्षण सुधार योजनेने नमूद केल्याचे दिसून येते. या बाबीनुसार अंमलबजावणी तर चालूच होती. त्याचबरोबर शिक्षणाचा प्रसार अधिकाधिक व्हावा, शिक्षणामुळे व्यक्तीचा विकास व्हावा आणि व्यक्तिच्या विकासातून राष्ट्राचा विकास व्हावा या विचाराची पेरणी करून सुसंस्कृत नागरीक तयार करणे व लोकशाहीनिष्ठ समाज–रचना तयार करणे हया सामाजिक ध्येयांची रूजवात झाली. त्याला अनुसरून तज्ञांनी आणि समाजसुधारकांनी शिक्षणाविषयी मांडलेली मते व केलेले शैक्षणिक कार्य ही तितकेच महत्वाचे आहे. त्यापैकी काहींचा उल्लेख मला नमूद करावासा वाटतो.

समाजातील अंधश्रध्दा, रूढी, अनिष्ट चालीरीती नष्ट होऊन समाजसुधारणा होण्यासाठी शिक्षण पध्दतीत बदल होणे गरजेचे आहे. असे राजा राममोहन रॉय यांचे मत होते, बहुजन समाजाला शिक्षण, उद्योग, व्यापारधंदे, नोकरी, राजकीय क्षेत्रात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी सार्वत्रिक शिक्षण प्रसाराचे साधन हाती घेतले होते. शिक्षण हेच खरे सामाजिक क्रांतीचे अत्यंत प्रभावी साधन असून प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार हा राष्ट्रप्रगतीच्या इमारतीचा पाया आहे हे स्पष्ट करून प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असा आग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धरला होता. तसेच शिक्षण हे सामाजिक सुधारणेचे प्रमुख साधन असल्याचे म.फुले सांगतात, त्याच बरोबर रविंद्रनाथ टागोर, म.गांधी, महर्शी धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.पंजाबराव देशमुख, स्वामी विवेकानंद या सारख्या अनेक महापुरूषांच्या, समाज–सुधारकांच्या, विचारवंतांच्या आणि शिक्षणतज्ञांच्या मतमतांतरावरून शिक्षण किती महत्वाचे आहे, शिक्षणामुळे कशी प्रगती होते, शैक्षणिक कार्यातून खरा माणूस घडविण्याची ताकद आहे, हे स्पष्ट होते. म्हणून तर देशभर प्राथमिक शिक्षणाची सोय करण्यात आली. आयोगाने आणि सुधारविषयक धोरणाने प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचा यशस्वी प्रयत्न सुरू झाला.

2000–2001 व 2010–2011 च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रामध्ये प्राथमिक शाळांची व विद्यार्थी संख्या खालील तक्त्यामध्ये दर्शविली आहे.

**Title :** *आजचे प्राथमिक शिक्षण : दिशा परिणाम व उपाय*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850 ]** *जवाहर लक्ष्मण मोरे* **yr:2013 vol:3 iss:2**

| सन | प्राथमिक शाळा | विद्यार्थी |
|---|---|---|
| 2000–2001 | 40854 | 11419711 |
| 2010–2011 | 80584 | 50927624 |

वरील आकडेवारीचा विचार करता प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या योजनांची अंमलबजावणी केल्यामुळे वाढ झाल्याचे दिसून येते. हीच आजच्या शिक्षणातील विकासाची नवी दिशा असू शकेल.
एवढयावरच शासन थांबलेलं नाही तर प्राथमिक शाळेची गुणवत्ता वाढविण्यासाठी अनेक उपाययोजना करताना दिसत आहे.
या उपाययोजनांचा थोडक्यात आढावा घेवू.

*उदा.–*

1) म.फुले शिक्षण हमी योजना– 6 ते 14 वर्षे वयोगटातील बालकामगार व शाळाबाहय मुलांना सोयीच्या वेळी व सोयीच्या ठिकाणी प्राथमिक शाळेची सोय व्हावी यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.
2) साखरशाळा– साखर कारखान्यात ऊसतोडीसाठी बाहेरील जिल्हयातून येणाऱ्या कामगारांच्या मुलामुलींसाठी सुरू केलेली शाळा म्हणजे साखरशाळा होय. स्थलांतरीत होणाऱ्या ऊस तोड कामगारांच्या मुलांची शिक्षणाची सोय या शाळेतून केली जाते.
3) सेतू वर्ग– जी मुले अर्ध्यातून शाळा सोडून जातात अशा मुलांसाठी उन्हाळयात सुट्टीमध्ये 45 दिवसांचा वर्ग चालवून मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम या वर्गामार्फत केले जाते.
4) सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना– 1983 पासून अंमलात आलेली ही योजना होय. मुलींना 12 वी पर्यंत शिक्षण घेताना अनंत अडचणी येतात. अशा मुलींना दत्तक घेऊन शिक्षणासाठी मदत करण्यासाठी पालकांनी उभे रहावे असे ही योजना सांगते.
5) पोशण आहार कार्यक्रम– शाळेत येणाऱ्या मुलांची संख्या वाढावी यासाठी देशभर शालेय पोशण आहार योजना सुरू करण्यात आली आहे. मुलांच्या उपस्थितीबरोबरच त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देणे हाही हेतू या योजनेचा होता.
6) सर्व शिक्षण मोहिम– मुलांना उपयुक्त आणि दर्जेदार प्राथमिक शिक्षणाची सुविधा पुरवणे हे या मोहिमेचे ध्येय असून समाज, वस्ती आणि स्थानिक लोकांच्या शालेय व्यवस्थापनातील सक्रीय सहभागाव्दारे सामाजिक प्रादेशिक आणि लिंगविषयक भेदभाव कमी करण्याचा प्रयत्न या मोहिमेतून साध्य केला जातो.
7) अपंग एकात्म शिक्षण योजना– ज्या शाळेत एकाच प्रकारचे अंपगत्व असलेले 8 विद्यार्थी असतील तर प्रशिक्षित शिक्षक, विशेष साहित्य, स्वतंत्र साधन खोली इ. पुरवून शिक्षण दिले जाते.
8) शाळा सुधार योजना– 'शाळा आपली व आपण शाळेचे' ही भावना लोकांमध्ये निर्माण व्हावी, भौतिक गरजा समाजाच्या मदतीने पूर्ण व्हाव्यात यासाठी शाळा सुधार योजना सुरू केली आहे.
9) अल्पसंख्यांक शिक्षण योजना– मातृभाषा, परंपरा, संस्कृती यांचे संरक्षण होण्यासाठी राज्यातील अल्पसंख्याकांच्या मुलामुलींच्या शिक्षणाची सोय करून देण्याचे काम ही योजना करते.
10) वस्ती शाळा– डोंगरी, दुर्गम गावापासून 1 कि.मी. दूर असलेल्या किंवा राहत असलेल्या आणि वाटेमध्ये ओढा किंवा नदी असलेल्या मुलांना गावातील शाळेत येणे अडचणीचे ठरते अशा मुलांसाठी पटसंख्येचे बंधन नसून वस्तीवर हया शाळा सुरू केल्या आहेत.
11) विशेश लक्ष्य गट– विशिष्ट जाती धर्मातील मुली, भटक्या विमुक्त झोपडपट्टीतील अपंग, देवदासी व वारांगना यांची मुलं ही दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहतात. त्यासाठी सर्व्हे करून त्यांना शिकण्यास प्रवृत्त याव्दारे केले जाते.
12) व्यक्तिमत्व विकास शिबीर – योगासने, व्याख्याने, सहल, खेळ, स्पर्धा, शारीरिक, मानसिक, बौध्दिक, भावनिक, सामाजिक, सृजनात्मक, भाषिक विकासासाठी अशी शिबीरे आयोजित केली जातात.

त्याच बरोबर अलिकडच्या काळात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी 1 ली ते 4 थी च्या मुलांना गणवेश वाटप, 5 वी ते 7 वी च्या विद्यार्थ्यांच्या पालकांना दरमहा 600 रू. प्रोत्साहन भत्ता, सावित्रीबाई फुले योजनेतून 5 वी ते 7 वी तील मागासवर्गीय मुलींना दरमहा 60 रू. दिले जातात तसेच सर्व मुलांना मोफत गणवेश आणि क्रमिक पाठयपुस्तके देण्यात येतात. इतक्या सोयी उपलब्ध करून देण्याचे काम शासन करते. शिक्षण हे अधिक विद्यार्थीभिमुख होण्यासाठी जून 2003 पासून जिल्हा परिषद अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राथमिक गुणवत्ता विकास अभियानाची सुरूवात केली. प्रत्येक जिल्हयात हा उपक्रम कार्यान्वित करण्यात आला आहे. त्यामध्ये स्वच्छ व सुंदर शाळा, अग्निपंख प्रयोगशाळा, प्रज्ञाचक्षु वाचनालय, योगासने, महिला कराटे प्रशिक्षण, आरोग्य, कार्यानुभव, चित्रकला, हस्तकला व प्रकल्प इ. अनेक उपक्रमाचा समावेश होतो. या उपक्रमातून विद्यार्थी सर्वगुणसंपन्न व्हावा, पटनोंदणी आणि उपस्थिती 100 टक्के असावी, जिल्हा परिषदेची शाळा व्यवस्थित चालावी, ग्रामीण भागात शाळा टिकावी हा हेतू आहे. प्राथमिक शाळेतील शिक्षकांनाही असे उपक्रम राबवण्यात विशेष आनंद किंवा रूची वाटते. पण प्रत्यक्ष हे उपक्रम राबवून घेतले जात नाहीत असे चित्र दिसते याचे कारण आणि परिणाम आपण शेवटी पाहणार आहोतच, पटपडताळणीचा विचार करता काय गौडबंगाल आहे. हे ही लक्षात येते.

साधारणपणे आतापर्यंत सांगितलेल्या सर्व धोरणे, योजना, मूल्यमापन पध्दतीने विद्यार्थी शाळेमध्ये दाखल झाले पण दाखल झालेले विद्यार्थी पुढे टिकत नाहीत. गुणवत्ता वाढताना दिसत नाही. असे चित्र निर्माण झाले. एकीकडे शासनाने नापास हा शब्द वापरू नये. मूल्यमापन हे श्रेणीवर करावे, मुलांना मारू नये, शाळेतून विद्यार्थ्यांचे नाव काढून टाकू नये, या उलट विद्यार्थ्यांनी शाळेत यावे म्हणून शाळा झाल्याची सूचना गावागावात, गल्लीगल्लीत ध्वनीक्षेपकावरून दिली जाते. शाळेत पहिल्या दिवशी येणाऱ्या मुलांचे नवागतांचे वाद्ये वाजवून गुलाबपुष्प देऊन स्वागतही करताना दिसते आहे. असं असतानाही मुलांची गळती आणि गुणवत्ता विकास न होण्याची कारणे खालील प्रमाणे सांगता येतील–

1) ग्रामीण भागामध्ये विजेची टंचाई असल्यामुळे दूरदर्शन, संगणक, इंटरनेट व इतर यांत्रिक साधनाचा वापर करता न आल्याने विद्यार्थ्यांचे शाळेकडे दुर्लक्ष झाले.
2) नेमणूक झालेले शिक्षक सोयीची शाळा बघतात. जोपर्यंत सोयीची शाळा मिळत नाही. तोपर्यंत शाळा आणि मुलं यांविशयी आस्था राहत नाही.
3) शिक्षकांची नेमणूक, बदल्या आणि बढत्या बऱ्याच वेळेला राजकीय दबावातून केल्या जातात. त्यामुळे गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न केल्याचे आढळत नाही.
4) पालक अज्ञानी, अंधश्रध्दा, रूढी, परंपरा पाळणारे आणि व्यसनाधीन असल्याने मुले शाळेकडे फिरकत नाहीत.
5) पालकांचा व्यवसाय, नोकरी व कामानिमित्त स्थलांतर करावे लागते त्यामुळे मुले आज इथे तर उद्या तिथे शिकताना दिसत नाहीत.
6) ग्रामीण भागातील शाळांच्या प्रशासनात, शैक्षणिक कारभारात, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांचा वाढता हस्तक्षेप

असल्यामुळे विद्यार्थी व शाळेच्या विकासाला बाधा येते.
7) अभ्यासक्रम, पाठयपुस्तके, मूल्यमापन, योजना, अध्यापन पध्दती, शासकीय योजना याबाबत नव्या गोष्टी शिक्षक लवकरच स्वीकारतील असे नाही.
8) शाळेत येण्यास वाहनांची सोय नसणे, शाळेची इमारत सुस्थितीत नसणे, भौतिक सुविधा अपूर्ण असणे, शिक्षक नोकरीच्या गावांपासून दूर राहणे, क्रीडांगणाची सोय नसणे अशा अनेक कारणांमुळे शाळेविषयी आकर्षण वाटत नाही.

यापेक्षा ही अनेक विद्यार्थी न टिकणे, गुणवत्ता न वाढणे याची असू शकतील यामुळे नव्याने सुरू झालेल्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा उधळता वारू ही रोखणे कठीण होऊन बसले आहे. याविषयी प्राथमिक शाळेतील काही शिक्षक मित्राशी या विषयाच्या अनुशंगाने चर्चा करताना यावर बरेच निष्कर्ष निघाले. याविषयी नेमकं शिक्षकांचं म्हणणं असं आहे की, वर्षभरामध्ये शिक्षकांना गटसंमेलन, बीटसंमेलन, तालुकास्तरीय संमेलनांना सामोरे जावे लागते. यामध्ये शिक्षक फक्त हजेरी लावण्याचे काम करतात. जनगणनेचे काम दिले जाते त्याशिवाय आता जातनिहाय जनगणनेचे काम ही त्यांना दिले आहे. सर्व निवडणुकांची जबाबदारीही शिक्षकांवर लादली जाते. वर्तमानपत्रामध्ये एक बातमी अशी होती की शिक्षकांना निवडणुकीचे काम देऊ नका त्यापेक्षा तरूण बेरोजगार पदवीधरांना प्रशिक्षण देऊन योग्य मोबदला देऊन निवडणुकीची कामे करावीत अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे. पण अशा बातम्या प्रत्येक निवडणुकी दरम्यान येतात पण फरक पडताना दिसत नाही. याशिवाय अलिकडे शाळेचे कुंपण आणि खोल्यांचे बांधकाम करून घेण्याचे कामही शिक्षकांवर लादले गेल्याचे दिसत आहे. अशा अनेक व्यापातून शिक्षकाने विद्यार्थ्यांकडे कसे लक्ष द्यावे याचे उत्तर शोधणे यानिमित्ताने मला गरजेचे वाटते. जोपर्यंत शासन यांना पर्यायी व्यवस्था करीत नाही, तोपर्यंत हे असंच चालू राहणार आहे. त्यामुळे खाजगी शाळा आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पेव फुटले आहे. काही शिक्षकांच्या मते पहिलीपासून इंग्रजी विषय सक्तीचा केला असला तरी खास इंग्रजी विषयाचा शिक्षक नसल्याने प्रभावीपणा जाणवत नाही. त्यासाठी इंग्रजी विषयाच्या शिक्षकांची मागणी ते करतात. मलाही ही मागणी रास्त वाटते. तसेच शाळेशी आपलं नातं जोडण्यासाठी काही ठोस पावले किंवा उपायोजना करण्याची आवश्यकता आहे त्यात खालील उपायांची अंमलबजावणी झाली तर चित्र नक्कीच आशादायी दिसेल असे वाटते. ते उपाय पुढील प्रमाणे–

1) शिक्षकांवरील अध्यापनेतर ताण अवास्तव ओझं कमी करावं.
2) सरकारी पैसा हा प्रत्यक्ष जि.प.शाळेकडेच सुपूर्द करण्यात यावा.
3) शिक्षक मुलांच्या मुलींच्या कडून शाळा झाडणे, परिसर स्वच्छ करणे यासारखी शिपायाची कामे करून घेतली जातात. तसेच तालुक्याच्या ठिकाणी विविध योजनांचा प्रतिपूर्तीचा अहवाल तयार करण्याचे काम शिक्षक हे लिपिकाचे काम जास्त करताना दिसतात म्हणून निदान 1 ते 7 वी पर्यंत शाळेत तरी लिपीक व शिपाई ही पदे कार्यरत असावीत पूर्वी तालुकास्तरावर 1987 दरम्यान शिपाई कार्यरत होते आता ते दिसत नाहीत.
4) प्राथमिक स्तरावर इंग्रजी, कला आणि संगणक या विषयांचे स्वतंत्र शिक्षक असावेत.
5) शाळेला कुंपण नसणे, क्रीडांगण नसणे, स्वच्छतागृहे नसणे, पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, वर्गामध्ये फळयांची सोय नसणे, एक शिक्षकी शाळा असणे या त्रुटी दूर करणे गरजेचे आहे.
6) शालेय व्यवस्थापन समिती व शालेय शिक्षण समितीचा व्यवहार पारदर्शी व समतोल, सामजंस्य आणि सलोखा निर्माण करणारा असावा.
7) ग्रामस्थांचा सहभाग शाळेच्या प्रत्येक कार्यक्रमात वाढवावा.
8) पालकांचा पाल्याच्या शिक्षणासंदर्भात निरूत्साह कमी करावा.
9) सामाजिक संघटनांनी, तरूण मंडळींनी शाळेच्या विकासात योगदान द्यावे.
10) वैयक्तिक हेवे दावे, राजकारण शाळेत कोणी आणू व करू नये.
11) शाळा हे आपले घर आहे. शाळेतील मुलं आपली मुलं आहेत अशा पध्दतीने रहावे.

तरच जिल्हा परिषदेच्या शाळेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलेल अन्यथा इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या वाढेल जागतिकीकरणाच्या रेटयामध्ये इंग्रजी किंतीही महत्वाची असली तरी मातृभाषेला विसरून चालणार नाही. इंग्रजी माध्यमांच्या शाळा निघण्याच्या अगोदर सगळे जिल्हा परिषदेच्या शाळेतून घडलेले आहेत. याची अनेक उदाहरणे आपल्या डोळयासमोर आहेत. हे नाकारून चालणार नाही.

शिक्षकांनी नव्या योजना, नव्या दिशा यांचा स्वीकार करून विद्यार्थी घडवणे हे आपले कर्तव्य आहे असे मानून कर्तव्यात कोणतीही कसूर होता कामा नये याकडे लक्ष द्यावे एकमेकांकडे बोट दाखवण्यापेक्षा शासन–प्रशासन– शिक्षक–विद्यार्थी यांचे नाते अतूट रहावे, असे मला वाटते नाहीतर बंडोपंत पाटील यांच्या वास्वव कवितेतील–

“आज शारदा विणा टाकून गिटार घेऊन नाचते आहे
शिक्षणाचा बाजार पाहून भारतमाता लाजते आहे”

या ओळी प्रत्यक्षात अवतरल्याशिवाय राहणार नाहीत. अशी अनामिक भिती वाटते.

***संदर्भ–***

1) भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण– डॉ.मीना मंगरूळकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
2) प्राथमिक शिक्षण सद्यस्थिती, समस्या व उपाय– प्रा.वामन भाळवणकर, सुविचार प्रकाशन, पुणे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net